साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
०२०-२५५३८०४१ ते ४४, Ext.no.३१७
commsugarvikas@gmail.com

जा.क्र./साआ/विकास/कक्ष-११/ ॲमिकस क्युरी/मजूर सोयी सुविधा/४५१ /२०२५ दि.03 /०७/२०२५

# परिपत्रक

**विषय :-** सु मोटो रिट याचिका क्र. १/२०२३ नुसार मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई यांचे निर्देशानुसार ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या सूचनांचे अंमलबजावणीबाबत...

**संदर्भ:-** १) या कार्यालयाचे दि. २३ जुलै २०१९ रोजीचे परिपत्रक.
२) या कार्यालयाचे दि. २० जून, २०२३ रोजीचे परिपत्रक.
३) या कार्यालयाचे दि. २१ नोव्हेंबर, २०२४ रोजीचे परिपत्रक.
४) सु मोटो रिट याचिका क्र. १/२०२३ नुसार मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई यांची दि.१७.०३.२०२५ रोजी झालेली सुनावणी
५) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचा शासन निर्णय क्र.ससाका ०५२३/प्र.क्र.१६२/२५-स दिनांक २८/०४/२०२५
६) या कार्यालयामार्फत दि.११/०६/२०२५ रोजीची दु.३.३० वाजता ची आयोजित व्ही. सी.

सु मोटो रिट याचिका क्र.१/२०२३ नुसार मा. उच्च न्यायालय खंडपीठ, मुंबई यांनी दि.१७.०३.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार ऊसतोड मजुरांच्या अनुषंगाने ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या सुचना शासनाने स्विकारलेल्या आहेत व त्यानुसार दि.२८/०४/२०२५ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हास्तरिय समिती गठीत करून त्याद्वारे ॲमिकस क्युरी यांचे सूचनांच्या अंमलबजावणीचे बाबत समिती कामकाज करणार आहे. ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या सुचनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी साखर कारखान्यांनी ऊसतोड मजुरांना गाळप हंगामात विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या सुचना या परिपत्राकसोबत जोडून पाठविण्यात येत आहेत. तथापी साखर कारखान्यांनी ऊसतोड मजुरांना गाळप हंगामात विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. गोपिनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार महामंडळाकडे ऊस तोडणी महिला व पुरुष मजुरांची नोंदणी करण्याबाबत कारखान्याच्या संबंधित अधिकाऱ्यांनी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने आवश्यक ते सहकार्य करावे. विविध योजनाची ऊस तोडणी मजुरांना माहिती देण्याची व्यवस्था करावी.
२. नोंदणी वेळी ऊस तोडणी मजुरांसाठी शासन, महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या व कारखाना राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजना/ उपक्रमांची सर्व ऊसतोडणी मजुरांना माहिती देण्यात यावी. तसेच साखर कारखान्याने मजुरांची निवास व्यवस्था असलेल्या ठिकाणी संबंधित शासकीय विभागांच्या मदतीने प्रबोधन शिबिरे आयोजित करण्याची व्यवस्था करावी.
३. नोंदणी वेळी ऊस तोड मजूर महिला, गरोदर महिला, स्तनदामाता व त्यांच्या समवेत असणारी बालके यांची दिलेल्या निर्देशानुसार आरोग्य तपासणी राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या मदतीने होणेबाबत व आनुषंगिक गरजेच्या सुविधा उपलब्ध होणेसाठी कारखान्यांनी आवश्यक दक्षता घ्यावी.
४. साखर कारखान्यांनी ऊस तोडणी मजुरांच्या मुलांसाठी जवळच्या अंगणवाडी, साखर शाळा, प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र यांची माहिती देऊन शाळेत प्रवेश मिळवून दयावा. ऊस तोडणी मजुरांची निवास व्यवस्था अंगणवाडी / प्राथमिक शाळेपासून दूर अंतरावर असल्यास या मुलांना शाळेत पोहोचविण्याठी कारखान्याने मोफत / विनामूल्य व्यवस्था करावी. साखर शाळा, कामगारांच्या मुलांसाठी प्रवासाची सोय, निवासी शाळा, अधिक वसतिगृहे आणि

पौष्टिक व संतुलित जेवण, शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, विविध भाषिक शिक्षण पुरवणे या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत

५. ऊस तोडणी मजुरांना कारखाना साईटवर वास्तव्य करण्यासाठी मजबूत, जलरोधक साहित्य असलेल्या पक्क्या / तात्पुरत्या घरांची निवास व्यवस्था करावी. शक्यतोवर पक्क्या घरांची व्यवस्था करावी.

६. साखर कारखान्यांनी ऊसतोड मजुरांना ऊसतोड क्षेत्रामध्ये तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मजबूत, टिकाऊ, जलरोधक साहित्य पुरवावे. ऊसतोड मजुरांच्या निवाऱ्याचे पाऊस, पूर, आग किंवा चोरीमुळे नुकसान झाल्यास त्याची भरपाई साखर कारखान्यांनी द्यावी. ऊसतोड मजुरांना वास्तव्यासाठी जागा व निधी उपलब्धतेनुसार पक्की घरे बांधण्यात यावी.

७. ऊस तोडणी मजुरांच्या निवास व्यवस्थेच्या ठिकाणी विजेची व गॅसची व्यवस्था असावी.

८. ऊस तोडणी मजुरांना संपूर्ण हंगाम कालावधीत पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्याची व्यवस्था करावी. प्राप्त माहितीनुसार काही कारखान्यांनी मजुरांना शुध्द पाणी पुरविण्यासाठी R.O प्लांटची सुविधा उपलब्ध केली आहे. ऊस तोडणी मजुरांचे आरोग्य सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व कारखान्यांनी मजुरांना प्रक्रिया केलेले शुध्द पाणी पुरविण्यासाठी सुविधा निर्माण करावी, ऊस तोडणी मजुरांमध्ये पिण्यासाठी उकळलेले पाण्याचा (Boiling Water) वापर करणेबाबत आरोग्य विभागाच्या सल्ल्याने जागृती करावी. तसेच दुर्गम ठकणी काम करणाऱ्या ऊस तोडणी मजुरांना देखील हंगाम कालावधीत पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्याची व्यवस्था करावी

९. ऊस तोडणी मजुरांसाठी त्यांच्या निवास व्यवस्थेच्या जवळ पक्की / तात्पुरती / फिरती स्वच्छतागृहे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन दयावीत. अशा स्वच्छतागृहांसाठी पुरेशा व नियमित पाण्याची व्यवस्था करावी. तसेच या स्वच्छतागृहांचे नियमितपणे निर्जंतुकीकरण करण्याची दक्षता घ्यावी.

१०. गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेचा ऊस तोडणी मजुरांच्या मुलांना लाभ मिळण्यासाठी साखर कारखान्यांनी महामंडळाकडे समन्वय करून आवश्यक तो पाठपुरावा करावा.

११. ऊस तोड मजुरांसाठी सामुदायिक स्वयंपाकघर व्यवस्था सुरू केल्यास अनेक कामगारांच्या जेवणाची सोय होईल व मूकदमाकडे शारिरीकदृष्ट्या कमकुवत असलेल्या परंतु पर्यायी रोजगाराअभावी ऊसतोडणीचे काम करणाऱ्या महिला ऊस तोड मजुरांना रोजगार मिळेल. ऊस कारखानदारांनी सामुदायिक स्वयंपाकघरासाठी स्रोत उपलब्ध करून द्यावेत.

१२. ऊस तोड व वाहतूक कामगार, महिला, गरोदर महिला, स्तनदामाता व त्यांच्या समवेत असणारी बालके यांची दिलेल्या निर्देशानुसार आरोग्य तपासणीसाठी राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या मदतीने कारखान्यांनी खालीलप्रमाणे किमान तीन वेळा वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

१) गाळप हंगामाच्या सुरुवातीला ऊस तोडणी मजुरांचे कारखाना स्थळावर आगमन झाल्यानंतर लगेच.

२) गाळप हंगामाच्या मध्यावर.

३) गाळप हंगाम संपताना ऊस तोडणी मजुर त्यांचे मूळगावी जाण्यापूर्वी.

गाळप हंगामात काही ऊस तोडणी मजुर तात्पुरत्या कालावधीसाठी ऊस तोडणी सुरु असलेल्या गावात वास्तव्य करीत असतात. त्यामुळे कारखान्यांनी अशा ऊस तोडणी मजुरांची तपासणी करण्यासाठी फिरत्या वैद्यकीय तपासणी पथकाची (मोबाईल व्हॅन) राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या मदतीने व्यवस्था करावी.

राज्यातील काही साखर कारखान्यांनी ऊस तोडणी मजुरांच्या आरोग्यासाठी कारखाना साईटवर पूर्ण वेळ डॉक्टर व परिचारिका यांच्यासह दवाखान्याची व्यवस्था केली आहे. ज्या कारखान्यांकडे सध्या अशी व्यवस्था नाही त्यांनी चालू गाळप हंगामात अशी व्यवस्था सुरु करावी.

१३. साखर कारखान्यांमार्फत महिला ऊसतोड मजुरांना मोफत सॅनिटरी नॅपकिन्स देण्यात यावेत.

१४. मातृत्व लाभ कायदा (सुधारणा) 2017 चे कलम 11नुसार ज्या ठिकाणी पन्नास किंवा त्याहून अधिक कर्मचारी आहेत, त्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा करणे बंधनकारक आहे.

१५. गर्भवती महिलांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे आणि गर्भवती महिलांना 1961 च्या प्रसूती लाभांतर्गत पगारी प्रसूती रजेचा लाभ मिळतो. गर्भधारणेच्या पाचव्या महिन्यात असलेल्या महिलांना काम करण्याची परवानगी देऊ नये. या मूलभूत

वैद्यकीय सुविधा पुरवण्यात अपयशी ठरणाऱ्या कोणत्याही साखर कारखान्यावर दंड आकारला पाहिजे आणि त्यांचा परवाना निलंबित केला पाहिजे अशा स्वरूपाच्या सूचना ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या आहेत त्या दृष्टीने देखील पूर्तता करावी.

१६. गाळप हंगामामध्ये ऊसतोडणी कामगार कामासाठी कारखाना स्थळावर आल्यानंतर सात दिवसांच्या आत कामगारांची यादी त्या जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी व ज्या जिल्हयातून ऊसतोडणी कामगार आले आहेत त्या जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी यांना ई-मेलद्वारे साखर कारखान्यांनी उपलब्ध करुन द्यावी.

१७. ऊस तोड मजुरांचे आरोग्य चांगले राहण्याच्या दृष्टीने स्थानिक वैद्यकीय व्यवसायिक आणि जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या मदतीने नियमित (शक्यतो आठवड्याला) आरोग्य शिबिरे आयोजीत करावी. तसेच प्रथमोपचार पेटी व मूलभूत वैद्यकीय प्रशिक्षण उपलब्ध होईल असे पहावे.

१८. ऊस तोडणी मजुरांना हवामानातील बदलामुळे/अन्य कारणामुळे संसर्गजन्य आजार होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सर्व ऊस तोडणी मजूर व त्यांच्या लहान मुलांसाठी विविध आजारांची लसीकरण मोहीम राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या मदतीने राबविण्यात यावी.

१९. गाळप हंगामा दरम्यान ३ वेळा वैद्यकीय तपासणी, फिरत्या वैद्यकीय तपासणी पथकाची व्यवस्था, संसर्गजन्य आजार होऊ नये म्हणून मजूर व त्यांच्या लहानमुलांसाठी प्रतिबंधात्मक लसीकरण इ. यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाशी संपर्क करुन ऊस तोडणी मजूर संख्या व ठिकाण निश्चित करुन दिनांक निहाय वैद्यकीय तपासणीचे नियोजन करण्यात यावे.

२०. अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी रेशन कार्डचे वितरण करावे, ज्यामुळे रेशन दुकानांमधून सहज धान्य उपलब्ध होऊ शकेल. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी सामुहिक प्रयत्नांद्वारे रेशनचे योग्य वितरण सुनिश्चित केले पाहिजे व फील्ड स्तरावर नियमित देखरेख ठेवली पाहिजे. यासाठी कारखान्याने समन्वय करून ऊस तोड मजुरांना मदत करावी.

२१. गाळप हंगामासाठी ऊस तोडणी मजुरांची कारखान्याकडे वाहतूक करण्यापूर्वी असे सर्व मजूर व त्यांच्या समवेत असणाऱ्या लहान मुलांचा कारखान्यांनी अपघात विमा उतरविण्याची व्यवस्था करावी. याकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई यांनी ऊस तोडणी मजूरांना लागू केलेली पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील ऊस तोडणी व वाहतूक शेतमजूर सुरक्षा विमा योजना सर्व साखर कारखान्यांनी त्वरित लागू करावी. याव्यतिरीक्त काही साखर कारखान्यांनी कारखाना स्तरावर स्वतंत्र निधी निर्माण करुन कारखान्याची स्वतःची योजना तयार केली आहे. उर्वरित साखर कारखान्यांनी देखील अशी योजना त्यांच्या स्तरावर सुरु करण्यास हरकत नाही.

२२. मयत असलेल्या कामगारांचे वारसास अर्थसहाय मदतीचे प्रस्ताव लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार कल्याण मंडळ, म.रा.पुणे यांचे पत्र क्र.८४ दि.०८/०९/२०२३ मध्ये नमुद केलेनुसार आवश्यक कागदपत्रानुसार परिपुर्ण प्रस्ताव सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे कार्यालयास वेळचेवेळीच सादर करावेत.

२३. स्थलांतरीत महिला मजूरांचे कोणत्याही प्रकारचे शोषण टाळण्यासाठी सर्व महिला मजुरांचे याबाबत समुपदेशन करण्यासाठी स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला डॉक्टर, स्थानिक महिला व बालविकास विभागातील महिला अधिकारी तसेच साखर कारखान्याच्या संचालक मंडळातील महिला संचालिका / सदस्य यांचा समावेश असलेली समिती गठीत करावी तसेच POSH कायद्यांतर्गत अनिवार्य असलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समित्या (Internal Complaints Committees - ICCs) स्थापन करणे आवश्यक आहे. हंगामाच्या सुरुवातीस ऊस तोडणी मजुरांचे कारखाना स्थळावर आगमन झाल्याबरोबर या समितीने असा महिला मजुरांचे समुपदेशन करावे, महिलांचे शोषण विषयक काही अनुचित घटना घडल्यास या समितीकडे तोंडी / लेखी तक्रार करण्याबाबत त्यांनी अवगत करावे, अशी तकार समितीकडे प्राप्त झाल्यानंतर समितीने तीन दिवसात त्याबाबत चौकशी करुन कारखान्याचे कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक यांना त्याबाबत अहवाल सादर करावा. संबंधित महिलेस नजीकच्या पोलिस स्टेशनमध्ये याबाबत प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्यासाठी कारखान्याने आवश्यक ती मदत करावी, तसेच संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी यांच्या अध्येक्षतेखालील शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या मदतीने अशा प्रकरणी मोफत कायदेशीर सल्ला व सहाय्य मिळवून देण्यासाठी कारखान्याने संबंधित गटविकास अधिकारी यांचेशी समन्वय करावा.

२४. हंगाम कालावधीत ऊस तोडणीसाठी स्थलांतरीत होणाऱ्या महिला मजुरांचे शोषण होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गृह विभागामार्फत कारखाना परिसरात तात्पुरती पोलीस चौकी उभारण्यात येणार आहेत. सदर तात्पुरत्या पोलीस चौक्यांकरिता आपल्या कारखाना परिसरात जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

२५. कोणत्याही परिस्थितीत १८ वर्षाखालील मुलांना ऊस तोडणीचे काम करु देऊ नये.

२६. राज्यातील सर्व साखर कारखान्यांवर ऊसतोड कामगार म्हणून काम करणा-या कामगारांचा समावेश असंघटीत कामगार म्हणून करण्यात आला असून केंद्र शासनाने असंघटीत कामगारांसाठी "असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ लागू केला आहे. सदर कायदयातील तरतूदीनुसार राज्यातील १२२ संवर्गातील असंघटीत कामगारांचा कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील ऊसतोड कामगारांच्या बाबत शैक्षणिक, आरोग्य विषयक, सामाजिक व सुरक्षा विषयक योजना राबविण्यासाठी कामगार विभागास सर्व सहकारी/खाजगी साखर कारखान्यांनी सहाय्य करावे.

२७. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बैठक-२०२०/प्र.क्र.९४/महामंडळे दि.०४/०८/२०२१ नुसार गठीत जिल्हा समितीचे बैठकांना प्रादेशिक सहसंचालक (साखर) किंवा त्याचा प्रतिनिधी यांनी उपस्थित राहुन सभेत झालेल्या निर्णयाचे अंमलबजावणीसाठी कारखाने व संबंधीतांकडे समन्वयक म्हणून कामकाज पहावे.

२८. ऊस उत्पादक शेतकरी तसेच ऊस तोडणी मजुरांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या संबंधित कायद्यातील तरतुदींचे / सूचनांने साखर कारखान्यांनी काटकोरपणे पालन करावे.

सदर परिपत्रकातील उपरोक्त सूचनांची अमलबजावणी होणेसाठीची पूर्वतयारी संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी गाळप हंगाम सुरु होण्यापूर्वी कार्यक्षेत्रातील साखर कारखान्यांची बैठक घेवून नियोजन करावे. तसेच प्रत्येक साखर कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी यांची हंगाम कालावधीत वेळोवेळी बैठक घेवून या सूचनांचे अनुपालन होत असल्याबाबत खात्री करुन या कार्यालयास अहवाल सादर करावा. सदर प्रकरणी ॲमिकस क्युरी यांनी दिलेल्या सूचनांचे अनुषंगाने पूर्तता न झाल्यास गाळप परवान्याच्या अनुषंगाने परवाना नाकारणे/निलंबन करणे/रद्द करणे याबाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

Signed by
Taware Deepak Ramchandra
Date: 03-07-2025 16:31:37
(दिपक तावरे)
आयुक्त (साखर)

प्रत - माहिती व उचित कार्यवाहीसाठी :

१. कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक, सहकारी/खाजगी साखर कारखाने (सर्व)

प्रत - माहितीसाठी:-

१. व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ, पुणे
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई
६. कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे.